Pune District Education Association's


**Baburaoji Gholap College,**

**Sangvi, Pune – 411027.**

**Annual Report**

| **Name of Department** | **Physical Education** | **Academic Year** | **2020-2021** |
|---|---|---|---|

| Sr.No. | Activities | Date | Place | Participated student and Teacher Number |
|---|---|---|---|---|
| 1. | Online International Yoga Day | 21/06/2020 | Online | 723 |
| 2. | 15th August Independence Program | 15/08/2020 | College Ground and Online | 75 |
| 3. | National Sports Day | 29/08/2020 | Online | 35 |
| 4. | On the Occasion of Shradchandraji Pawar Saheb's Birthday Online Surynamskar Activity | 13/12/2020 | Online | 6067 |
| 5. | On the Occasion of Shradchandraji Pawar Saheb's Birthday Online Walking Activity | 14/12/2020 | Online | 3998 |
| 6. | On the Occasion of Shradchandraji Pawar Saheb's Birthday Online Running Activity | 15/12/2020 | Online | 2782 |
| 7. | On the Occasion of Shradchandraji Pawar Saheb's Birthday Online Cycling Activity | 15/12/2020 | Online | 2464 |
| 8. | 26th Jan. Republic Day Program | 26/01/2021 | College Ground | 140 |
| 9. | Hutatma Day | 30/01/2021 | College Ground | 45 |
| 10. | Puzzle Relay Field Competition | 05/02/2021 | College Ground | 36 |
| 11. | Lathi Kathi Training on the Occasion of World Women's day 2021 | 08/03/2021 | P.G. Building | 115 |




## घोलप महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या सांगवी येथे बाबुरावजी घोलप महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . नितीन घोरपडे यांच्या मार्गदर्शनातून योगाचे गाढे अभ्यासक रुपेश थोपटे यांच्या आॅनलाईन योग प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . या कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ . नितीन घोरपडे यांच्या हस्ते झाले. यावेळी उपप्राचार्य डॉ.लतेश निकम, शारीरिक शिक्षण संचालिका प्रा . विद्या पाठारे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत असताना महावि द्यालयाचे प्राचार्य डॉ . नितीन घोरपडे यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाची संकल्पना स्पष्ट करत फक्त एका दिवसापुरता योग न करता दैनंदिन जीवनामध्ये योग शैली आत्मसात करणे गरजेचे आहे , असे स्पष्ट करत उत्तम शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी योगाचे महत्व विशद केले. तसेच कोरोना काळामध्ये योगाचे महत्व खऱ्या अर्थाने लोकांना माहीत झाल्याचे नमूद करत आहार-विहार, आसन, प्राणायाम, ध्यान इत्यादी पैलूवर थोडक्यात माहिती दिली . त्याचबरोबर सर्व उपस्थितांना आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा देत दैनंदिन दिनचर्येमध्ये योगाचा समावेश करावा , असे आवाहन केले.

यावेळी योग प्रशिक्षक रुपेश थोपटे यांनी योग प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात करत योग म्हणजे स्वतःच्या अनुभवाचं शास्त्र असे नमूद करत आनंदी जीवनासाठी योगाचे महत्व उपस्थितांसमोर मांडले . तसेच उपचार किंवा चिकित्सा पद्धतीने योगा कडे न बघता आयुष्य जगण्याची पद्धती म्हणून योगा कडे बघण्याचा दृष्टिकोन निर्माण झाला पाहिजे , असे मत व्यक्त व्यक्त केले . त्याच बरोबर ज्ञानयोग, भक्तियोग,

एकाग्रता, सूक्ष्म शरीर, नाडी शुद्धी प्राणायाम इत्यादी घटकावर सविस्तर माहिती देत विविध योगासन व प्राणायाम प्रकार यांचे प्रात्यक्षिक दाखवत उपस्थितांकडून करून घेतले.

प्रशिक्षण कार्यक्रमानंतर उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देत त्यांचे शंका निरसन केले.

डॉ. राणी भगत यांनी प्रशिक्षकांचा परिचय करून दिला.

या ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ . नितीन घोरपडे, सूत्रसंचालन प्रा. विद्या पाठारे तर आभार प्रदर्शन प्रा. संतोष सास्तुरकर यांनी केले.

झूम ॲप व युट्युब लाईव्ह दारे इतर महाविद्यालयातील सुमारे ७२३ पेक्षा जास्त शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी या योग प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये उपस्थित होते.

## महाविद्यालयामध्ये स्वतंत्रता दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या सांगवी येथील बाबुरावजी घोलप महाविद्यालयामध्ये स्वतंत्रता दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला या . प्रसंगी प्राचार्य डॉ. नितीन घोरपड ., यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले .यावेळी, प्राचार्य डॉ. नितीन घोरपड . उपप्राचार्य डॉलतेश निकम ., लेफ्टनंट विठ्ठल नाईकवाडी आदी मान्यवर उपस्थित होते . त्यानंतर शारीरिक शिक्षण संचालिका प्रा . विद्या पाठारे यांनी उपस्थित सर्व प्राध्यापकांना ध्वज प्रतिज्ञा दिली . झूम ॲप व युट्युब लाईव्ह दारे महाविद्या लयातील सुमारे ३५ पेक्षा जास्त शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी कार्यक्रमामध्ये उपस्थित होते.




क्रीडा विभागातर्फे २९ ऑगस्ट २०२० रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला यावेळी ३५ खेळाडू उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत क्रीडांगण व जिमखाना पूजन करण्यात आले.




***बाबुरावजी घोलप महाविद्यालयात फिट इंडिया मुव्हमेंट उपक्रमांतर्गत विविध क्रीडा उपक्रम***

विद्यार्थ्यांचे शारीरिक तंदुरुस्ती उत्तम असेल तर क्रीडा विषय प्राविण्याबरोबरच विविध महाविद्यालयातील उपक्रमांमध्ये विद्यार्थी यशस्वी होऊ शकेल हा उद्देश ठेवून फिट इंडिया उपक्रमांतर्गत आरोग्यविषयक जनजागृती करण्यासाठी हा उपक्रम १२ डिसेंबर ते १४ डिसेंबर, २०२० यादरम्यान यशस्वीरित्या राबविण्यात आला . यामध्ये पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या विविध शाळा व महाविद्यालयातील सायकलिंग वॉकिंग रनिंग इत्यादी क्रीडा प्रकाराचे आयोजन केले होते . यामध्ये एकूण 71 शाळा-महाविद्यालयातील 9,210 विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी या उपक्रमात सहभाग घेतला .

यामध्ये सायकलिंग 7,985 कि. मी. वॉकिंग 10,015 कि. मी. आणि रनिंगसाठी 7,160 कि.मी. असे एकूण कि.मी. 30,973 कि.मी. या अभिनव उपक्रमात विद्यार्थ्यांनी प्रचंड उत्साहाने सहभाग नोंदविला . त्याचबरोबर विद्यार्थ्यांना शारीरिक तंदुरुस्ती विषयक वेगवेगळे संदेश देण्यात आले होते . नियमित व्यायाम केला तर आपले आरोग्य संतुलित राहून आपण वेगवेगळ्या आजारापासून मुक्त राहू शकतो असा संदेश सुद्धा या उपक्रमाच्या अंतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात आला.






**घोलप महाविद्यालयामध्ये सूर्यनमस्कार उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद.**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या सांगवी येथील बाबुरावजी घोलप महाविद्यालयामध्ये माजी केंद्रिय कृषिमंत्री पद्मविभूषण मा .शरदचंद्रजी पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सूर्यनमस्कार स्पर्धेला उत्स्फूर्त त्स्फू प्रतिसाद मिळाला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .नितीन घोरपडेयांनी सूर्यनमस्काराचे महत्त्व, त्याचे फायदे व सूर्यनमस्कार घालण्याची पद्धत याविषयी माहिती दिली तसेच सू .र्यनमस्काराचे स्वतः प्रात्यक्षिक करून दाखवत उपस्थित महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व शिक्षकांचे मनोबल वाढविले. प्राचार्य डॉ नितीन घोरपडे यांच्या मार्गदर्शना . खाली शारीरिक शिक्षण संचालिका प्रा विद्या . पाठारे यांनी या उपक्रमाचे नियोजन के ले गुगल मीट व झुम .ॲप या दुरदृश्य प्रणालीचा वापर करून ५३० विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते तसेच महाविद्यालयातील शिक्षके तर कर्मचाऱ्यांसाठी देखील यावेळी विशेष सत्राचे आयोजन करण्यात आलेहोते सदर उपक्रमामध्ये . घोलप महाविद्यालया मार्फत ४०३७ इतक्या विक्रमी सुर्यनमस्कारांची नों द करण्यात आली . या उपक्रमाच्या यशस्वीतेबद्दल महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा अजित दादा . पवार, उपाध्यक्ष राजेंद्रजी घाडगे , मानद सचिव ॲड संदीप कदम ., खजिनदार ॲड मोहनराव देशमुख ., उपसचिव लक्ष्मणराव पवार , सहसचिव आत (प्रशासन)ुमाराम जाधव यांनी महाविद्यालयाचे अभिनंदन केले असून सर्व स्तरातून महाविद्यालयावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.




**माजी केंद्रीय कृषिमंत्री पद्मविभूषण मा. शरदचंद्रजी पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे जिल्हा शिक्षण मंडळातर्फे आयोजित सूर्यनमस्कार उपक्रम**

मा. शरद चंद्रजी पवार साहेब यांच्या ८०व्या वाढदिवसानिमित्त पुणे जिल्हा शिक्षण मंडळाशी सलंग्नित सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये ८०,००० सूर्यनमस्काराचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते . विद्यार्थी व शिक्षकांच्या उस्फूर्त प्रतिसादामुळे दिलेल्या उदिष्टापेक्षा दुप्पट म्ह णजे ६८,९८४ सूर्यनमस्कार पूर्ण केले . गुगल मिट , झूम या प्रणालीचा वापर करून आयोजित या ऑनलाइन उपक्रमांमध्ये ८० शाळा व महाविद्यालयातील १३,४६८ विद्यार्थी व १,५३५ शिक्षकांनी सहभाग घेतला यानंतर गुगल फॉर्म द्वारे सहभागी विद्यार्थी व शिक्षकांची नोंद घेतली गेली.

आकुर्डी येथील म्हाळसाकांत विद्यालयाने सर्वात जास्त ३३,१३० सूर्यनमस्काराची नोंद केली तर अण्णासाहेब मगर महाविद्यालय हडपसर , पिरंगुट इंग्लिश स्कूल पिरंगुट , श्री शहाजी हायस्कूल सुपे यांनी दहा हजारांपेक्षा जास्त सूर्यनमस्काराची नोंद केली . या कार्यक्रमाचे आयोजन पु णे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वतीने संस्था पातळीवर सांगवी येथील बाबूरावजी घोलप महाविद्यालया मार्फत करण्यात आले. प्राचार्य डॉ . नितीन घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालिका प्रा. विद्या पाठारे यांनी या उपक्रमाचे नियोजन केले.

***बाबुरावजी घोलप महाविद्यालयात फिट इंडिया मुव्हमेंट उपक्रमांतर्गत विविध क्रीडा उपक्रम***

विद्यार्थ्याचे शारीरिक तंदुरुस्ती उत्तम असेल तर क्रीडा विषय प्राविण्याबरोबरच विविध महाविद्यालयातील उपक्रमांमध्ये विद्यार्थी यशस्वी होऊ शकेल हा उद्देश ठेवून फिट इंडिया उपक्रमांतर्गत आरोग्यविषयक जनजागृती करण्यासाठी हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला.

यामध्ये पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या विविध शाळा व महाविद्यालयातील सायकलिंग वॉकिंग रनिंग इत्यादी क्रीडा प्रकाराचे आयोजन केले होते . यामध्ये एकूण 71 शाळा-महाविद्यालयातील 9,210 विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी या उपक्रमात सहभाग घेतला . यामध्ये सायकलिंग 7985 कि. मी. वॉकिंग 10,015 कि. मी, आणि रनिंगसाठी 7,160 कि .मी असे एकूण कि.मी, 30,973 कि.मी या अभिनव उपक्रमात विद्यार्थ्यांनी प्रचंड उत्साहाने सहभाग नोंदविला . त्याचबरोबर विद्यार्थ्यांना शारीरिक तंदुरुस्ती विषयक वेगवेगळे संदेश देण्यात आले होते . जेणेकरून विद्यार्थ्यांना चांगल्या पद्धतीची क्रीडाविषयक तयारी करण्यासाठी व्यायाम किती महत्त्वाचा आहे?, नियमित व्यायाम केला तर आपले आरोग्य संतुलित राहून आपण वेगवेगळया आजारापासून मुक्त राहू शकतो असा संदेश सुद्धा या उपक्रमाच्या अंतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात आला.

विराज जाधव याला 'पै खाशाबा जाधव सुवर्णपदक .' जाहीर 56 पुणेजिल्हा शिक्षण मंडळाच्या सांगवी येथील बापूरावजी घोलप महाविद्यालयातील विराज जाधव या विद्यार्थ्याची सावित्रीबाई फु लेपुणेविद्यापीठाच्या पुरुष वर्गातील २०१९ या शैक्षणिक वर्षातील सर्वो त्कृष्ट खेळाडू म्हणुन २० - 'पै . खाशाबा जाधव सुवर्णपदक' बहुमानासाठी निवड झाली आहे . सावित्रीबाई फु ले पुणे विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळामार्फत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांमधून पुरुष व महिला वर्गातील प्रत्येकी एका विद्यार्थ्यांची सर्वो त्कृष्ट खेळाडू म्हणून निवड करण्यात येते सर्वो त्कृष्ट खेळाडू हा . २०१४ रीबाई फु लेपुणेविद्यापीठातर्फेशैक्षणिक वर्ष मान प्राप्त विद्यार्थ्याचा साविूबिहु- १५ पासून 'पै . खाशाबा जाधव सुवर्णपदक' व ५१००० रोख रक्कम देवुन गौरव करण्यात येतो . मुळ सांगलीचा असलेल्या व महाविद्यालयामध्ये इतिहास विषयामध्ये पदवीत्तर शिक्षण घेत असलेल्या विराजने आतापर्यंत उदयपूर येथेझालेल्या (राजस्थान) आं तर विद्यापीठ कयकिंग अँड कॅनोईग स्पर्धेत सावित्रीबाई फु ले पुणेविद्यापीठाकडून सहभाग घेत २ सुवर्णपदक, १ रौप्य पदक व १ कांस्य पदकाची कमाई के ली असून आतापर्यंत पाच राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये १५ सुवर्णपदक, ६ रौप्य पदक व ४ कास्यपदक पटकाविले

असून पाच राष्ट्रीय स्पर्धेमध्येभाग घेत दोन आं तरराष्ट्रीय स्पर्धानिवड चाचणी मध्येसहभाग नोंद विला आहे विराज जाधव याच्या यशस्वी वाटचालीमध्ये महाविद्यालयाचे कर्तव्यदक्ष व विद्यार्थी प्रिय प्राचार्य डॉ.नितीन घोरपडे, शारीरिक शिक्षण संचालिका प्रा विद्या पठारे यांचे . मार्गदर्शन लाभले असून या देदीप्यमान यशाबद्दल महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणेजिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा अजित . दादा पवार, उपाध्यक्ष राजेंद्रजी घाडगे, मानद सचिव अॅड संदीपजी कदम ., खजिनदार अॅड मोहनराव . देशमुख, उपसचिव लक्ष्मणराव पवार , सहसचिव आत्माराम जाधव यांनी विराज जाधव व (प्रशासन) बाबुरावजी घोलप महाविद्यालयाचेविशेष अभिनंदन करत पुढील यशस्वी कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.

## घोलप महाविद्यालयामध्ये प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी २०२१

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या सांगवी येथील बाबुरावजी घोलप महाविद्यालयामध्ये ७२ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला याप्रसंगी .पुणेजिल्हा शिक्षण मंडळाचे सहसचिव आत्माराम .श्री (प्रशासन) जाधव यांच्या हस्तेध्वजारोहण करण्यात आले नितीन .यावेळी प्राचार्यडॉ . घोरपडे, उपप्राचार्य डॉ लतेश निकम ., लेफ्टनंट विठ्ठल नाईकवाडी आदी मान्यवर उपस्थित होते . महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्या र्थ्यांनी शिस्तबद्ध व दिमाखदार पथसंचलन करत राष्ट्रध्वजाला मानवंदना देत सगळयांचेलक्ष वेधून घेतले विद्या .त्यानंतर शारीरिक शिक्षण संचालिका प्रा . पाठारेयांनी उपस्थित सर्वप्राध्यापकांना ध्वज प्रतिज्ञा दिली आजच्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणेम्हणून . उपस्थितराहिलेले पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सहसचिव आत्माराम जाधव यांनी .श्री (प्रशासन) प्रजासत्ताक दिनानिमित्त महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणेजिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा . अजितदादा पवार व सर्वपदाधिकारी यांच्या वतीने सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या . प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत महाविद्यालय व विद्यापीठ पातळीवर विविध स्पर्धांमध्ये नैपुण्य प्राप्त केलेल्या तसेच कौतुकास्पद कामगिरी बजावलेल्या विभागांचा तसेच प्राध्यापक व विद्यार्थी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला .

## हुतात्मा दिवस ३० जानेवारी २०२१

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचेकार्यव अहिंसा तत्व हेसंपूर्णजगासाठी नेहमीच आदर्शव मार्गदर्शक राहिलेलेआहे. समाज घडविण्याची महत्त्वाची जबाबदारी निभावण्यासाठी शिक्षकांनी महात्मा गांधी

यांच्या कार्यापासून प्रेरणा घेत विद्यार्थ्यांमध्ये गांधीजींचे चरित्र निर्माण करून नवा भारत घडवावा , असे प्रतिपादन बाबुरावजी घोलप महाविद्यालयाचेप्राचार्यडॉ. नितीन घोरपडेयांनी के ले . पुणेजिल्हा शिक्षण मंडळाच्या सांगवी येथील बाबुरावजी घोलप महाविद्यालयामध्येहुतात्मा दिनानिमित्त देशाच्या स्वातंत्र्या साठी प्राणार्पण के लेल्या हुतात्म्यां च्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी आयोजित आदरांजली कार्यक्रमामध्येतेबोलत होतेलतेश निकम .यावेळी महाविद्यालयाचेउपप्राचार्यडॉ ., सकाळ सत्र प्रमुख डॉ . वंदना पिंपळेआदी मान्यवर उपस्थित होते . यावेळी हुतात्मा दिनाच्या निमित्तानेमहाविद्यालयाचेउपप्राचार्यडॉ लतेश निकम यांनी विद्यार्थ्यांना महात्मा गांधी . यांचेकार्यव त्यागाविषयी उपस्थितांना सविस्तर माहिती दिली . या आदरांजली कार्यक्रमाचेसूत्रसंचालन शारीरिक शिक्षण संचालिका प्रा वंदना . विद्या पाठारेतर आभारप्रदर्शन डॉ . पिंपळेयांनी के ले . कोविड १९ - विषयक शासन नियमांचेपालन करत व शारीरिक अंतर राखत पार पडलेल्या या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील सर्वशिक्षक व शिक्षके तर कर्मचारी उपस्थित होते.

## Puzzle Really ५ फेब्रुवारी२०२१

५ फेब्रुवारी २०२० रोजी महाविद्यालयामध्ये आंतर वर्गीय क्रीडा स्पर्धा Puzzle Really चे आयोजन करण्यात आले . विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांनी आपले शारीरिक स्वास्थ्य उत्तम ठेवले तर कोणत्याही क्षेत्रामध्ये बौद्धिक प्रगतीसाठी त्याचा उपयोग होऊ शकतो हा उद्देश ठेवून बाबुरावजी घोलप महाविद्यालयातील क्रीडा व जिमखाना विभागाच्या माध्यमातून कै . बाबुरावजी घोलप सप्ताहानिमित्त Puzzle Really या नाविन्यपूर्ण क्रीडा प्रकारांचे आयोजन जिमखान्याच्या वतीने प्रा. विद्या पाठारे यांनी केले होते. या कार्यक्रमाचे उद्धाटन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती अध्यक्ष मा .अतुल शितोळे यांनी केले . कोरोना कालावधीमध्ये शारीरिक क्षमता अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी व्यायामाबरोबरच विद्यार्थ्यांनी वेगवेगळया क्रीडा प्रकारामध्ये सहभागी झाले पाहिजे असे त्यांनी उद्धाटन प्रसंगी बोलताना खेळाडूंशी संवाद साधला . कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नितीन घोरपडे यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच कोणता तरी एक क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी झाले पाहिजे जेणेकरून त्या आधारे खेळाडूंना शारीरिक तंदुरुस्ती बरोबरच बौद्धिक निर्णय क्षमता सुद्धा वाढवता येईल . त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयांमध्ये Puzzle Really या क्रीडा प्रकाराचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगि तले. यात खेळाडू क्रीडांगणावर आपल्या बौद्धिक नेतृत्वाला सुद्धा तो चालना देऊ शकेल हा उद्देश असल्याचे

त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना सांगितले . यामध्ये विजेता संघ S.Y.B.sc (संगणक विभाग) तर तृतीय वर्ष कला उपविजेता ठरला . महाविद्यालयातील विविध वि भागातील 10 संघ सहभागी झाले होते .शारीरिक क्रीडा संचालिका प्रा . विद्या पाठारे यांनी प्रास्ताविक केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नरसिंग गिरी तर आभार प्रा. संतोष सास्तूरकर यांनी मानले. तसेच या कार्यक्रमासाठी प्रा. विठ्ठल नाईकवाडी, प्रा.दिपाली जोशी, प्रा.सोनल कदम, प्रा.अनुपमा कदम, प्रा. सोनाली बाविस्कर,प्रा. सोमीनाथ आव्हाड, श्री. प्रणित पावले, श्री.बाबा गायकवाड, आदी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व खेळाडू उपस्थित होते.

**घोलप महाविद्यालयामध्येमहिला दिनानिमित्त लाठीकाठी प्रशिक्षण - ८ मार्च २०२१**

पुणेजिल्हा शिक्षण मंडळाच्या सांगवी येथील बाबुरावजी घोलप महाविद्यालयामध्येजागतिक महिला दिनानिमित्त प्राचार्यडॉ नितीन घोरपडेयांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील सर्वमहिला . संरक्षणाचेधडे - सहकाऱ्यांना स्व मिळावे या उद्देशाने जिमखाना विभागाच्या वतीने लाठी काठी - प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले या . कार्यक्रमाचे उद्घाटन यावेळी सकाळ सत्र प्रमुख .हस्तेझाले वंदना पिंपळे .डॉ, जिमखाना विभाग प्रमुख प्रा. विद्या पाठारे आदी मान्यवर उपस्थित होते. शाहू कला क्रीडा अकादमीच्या प्रा अनुराधा एडके यांनी महिलांसाठी लाठी काठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे . आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे विशेष कौतुक के ले. यावेळी शाहू लक्ष्मी कला क्रीडा अकादमीच्या प्रा . अनुराधा एडके व राज तांबोळी यांच्यासहित अकादमीच्या प्रशिक्षित विद्यार्थ्यांनीनी लाठी काठी चालवण्याचे प्रशिक्षण व स्व संरक्षणासाठी धडे उपस्थित महिला वर्गाला दिले.

# Cultural committee Annual report 2020-21

# सांस्कृतिक समिती अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये सांस्कृतिक विभामार्फत दिनांक ५ जुलै २०२० रोजी गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली गुरुपौर्णिमा चे भारतीय संस्कृतीत अनन्य साधारण महत्व आहे. . गुरु प्रति आदरभाव विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण व्हावा हा या मागील उद्देश असतो. गुरुपौर्णिमेच्या निमित्त्याने संस्थेच्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी तसेच शिक्षकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयो जित केला होती . या मध्ये एकूणखालील विद्यार्थ्यांनी भाग घेतला .

१. शिवांजली अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय सासवड .

२.सुवर्ण कामठे अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय सासवड

३.ऐश्वर्या कामठे बाबुरावजी घोलप कॉलेज

४. योगेश जाधव रामकृष्ण मोरे कॉलेचे आकुर्डी

५. प्राजक्ता कडलग बाबुरावजी घोलप कॉलेज

६. हरी सोळंकी मामासाहेब मोहोळ महाविद्यालय पौड रोड

७ माधुरी डोरले बाबुरावजी घोलप महाविद्यालय सांगवी

८.विश्वजित कांबळे अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय सासवड

९. रोहित तांबे बाबुरावजी घोलप महाविद्यालय सांगवी

१०. डॉ सतीश एकर बाबुरावजी घोलप महाविद्यालय सांगवी

११ डॉ संगीत घोडके बाबुरावजी घोलप महाविद्यालय सांगवी

१२ शुभांगी घुले बाबुरावजी घोलप महाविद्यालय सांगवी

१३.डॉ माया माईणकर बाबुरावजी घोलप महाविद्यालय सांगवी

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नितीन घोरपडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

तसेच प्रख्यात गायक आणि रामकृष्ण मोरे महाविद्यालय आकुर्डी येथील माजी विद्यार्थी सचिन उबाळे यांनी बहारदार गीते सादर केलित .

कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. माया माईणकर यांनी केले. डॉ सतीश एकर यांनी आभार व्यक्त केलेत .

त्यावेळी बाबुरावजी घोलप महाविद्यालयावह संपूर्ण कर्मचारी वृंदऑनलाईन पद्धतीने हजार होता .

कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने झूम या ऍप वर विद्यार्थी उपस्थित होते

दिनांक ८ नोव्हेंबर २०२० रोजी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेचे विषय खालील प्रमाणे होते

१.. प्रा रामकृष्ण मोरे -द्रष्टा राजकारणी

२. प्रा रामकृष्ण मोरे यांचे जीवन कार्य

३. प्रा रामकृष्ण मोरे यांचे शिक्षण विषयक विचार

माननीय प्राचार्य डॉ नितीन घोरपडे यांनी या प्रसंगी मार्ग दर्शन केले आणि प्रा रामकृष्ण मोरे साहेबांच्या स्मृतीला उजाळा दिला

या मध्ये एकूण १० विद्यार्थी सहभागी झालेत

१. वैशाली राजेंद्र कात्रे FYBCom

२.वैशाली पांचाळ FYBA

३.पिराजी खंकारे FYBCom

४.संजीवनी जोरी FYBA

५. हर्षदा जाधव SYBSC

६.प्रतीक्षा कांबळे FYBCOm

७ऋषिकेश काकडे FYBCA

८. शुभांगीगाडेकर FYBCom

९. सिद्धेश काकडे FYBCA

१० श्रावस्ती चितारी FYBA

यांनी भाग घेतला

प्रथम क्रमांक -हर्षदा जाधव SYBSC

द्वितीय क्रमांक संजीवनी जोरी FYBA

तृतीय क्रमांक शुभांगी काडेकर FYBCOM

उत्तेजनार्थ पारितोषिक सिद्धेश काकडे FYBCA

आणि पिराजी खंकारे FYBCom याना विभागून देण्यात आले

कार्यक्रमाचे संचालन डॉ माया माईणकर यांनी केले . आभार सुवर्ण खोडदे यांनी मानले.

५. हर्षदा जाधव SYBSC

६.प्रतीक्षा कांबळे FYBCOm

७ऋषिकेश काकडे FYBCA

८. शुभांगीगाडेकर FYBCom

९. सिद्धेश काकडे FYBCA

१० श्रावस्ती चितारी FYBA

यांनी भाग घेतला

प्रथम क्रमांक -हर्षदा जाधव SYBSC

द्वितीय क्रमांक संजीवनी जोरी FYBA

तृतीय क्रमांक शुभांगी काडेकर FYBCOM

उत्तेजनार्थ पारितोषिक सिद्धेश काकडे FYBCA

आणि पिराजी खंकारे FYBCom याना विभागून देण्यात आले

कार्यक्रमाचे संचालन डॉ माया माईणकर यांनी केले . आभार सुवर्ण खोडदे यांनी मानले

कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारे तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अतिशय सुरेख पाधाणीते हे कार्यक्रम घेण्यात आले. माननीय प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली सगळे कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने व्यवस्थित पार पडले..

बाबुरावजी घोलप महाविद्यालयात दिनांक २६ जानेवारी २०२१ रोजी प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम घेण्यात. कार्य क्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सहाय्यक सह सचिव माननीय ए एम जाधव साहेब उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्यात. तसेच भारत हा गणराज्य कसा झाला हेही सांगितले. तसेच ध्वजाचे महत्व विशद केले. ध्वज सार्वभौमत्वाचे शपथ घेण्यात आली. NCC च्या विद्यार्थ्यांनी परेड केली. त्याचवेळी पद्मविभूषण माजी कृषी मंत्री माननीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसाच्या निमित्तयाने पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन बक्षिसे प्राप्त करणाऱ्या विषयार्थ्यांना आणि शिक्षकानं पुरस्कार देण्यात आलेत . रांगोळी वैष्णवी जाधव या विद्यार्थिनीने काढली. NSS च्या विद्यार्थिनींनी राष्ट्र गीत आणि ध्वज गीत म्हंटले. नियतकालिक साठी फोटो काढण्यात आले.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या बाबुरावजी घोलप महाविद्यालयात कैलास वासी बाबुरावजी घोलप साहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्त दिनांक १ फेब्रुवारी २०२१ रोजी घोलप सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये रांगोळी स्पर्धा ड्रॉईंग पेंटिंग फोटोग्राफी याचे प्रदर्शन आणि शिक्षण महर्षी बाबुरावजी घोलप हे नाट्यछटा सादर करण्यात आले एकूण 15 विद्यार्थ्यांनी रांगोळी स्पर्धेत भाग घेतला.

रांगोळी स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे आहे

१.नायडू निकिता FYBA

२. जोरी संजीवनी FYBA

३. रासकर प्रतीक्षा सिबसकं. (C.S. )

नाट्य छटे ची संकल्पना प्राचार्य डॉक्टर नितीन घोरपडे

लेखन डॉक्टर माया माईणकर

दिग्दर्शन डॉक्टर सतीश एकार

संगीत डॉक्टर सतीश एकार

कलाकार

बाबुरावजी घोलप- अमोल साबळे

अण्णासाहेब आवटे- शुभम येनुरकर

शंकराव भेलके आणि बापूसाहेब जेथे- शुभम वाल कोळी

शारदाबाई पवार -काजल कांबळे

लक्ष्मीबाई घोलप- प्रणाली गायकवाड

ड्रॉइंग फोटोग्राफी आणि पेंटिंग या प्रदर्शनासाठी एकूण 22 विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

त्यांचे एकूण 96 चित्र आणि 42 फोटो प्रदर्शनामध्ये ठेवण्यात आले.


यामध्ये व्यक्तिचित्रे निसर्ग चित्र फॅशन डिझाइनिंग चे चित्र मंडेला आर्ट इत्यादी प्रकारांचा समावेश होता.


प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली हा संपूर्ण कार्यक्रम पार पडला या कार्यक्रमासाठी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानद सचिव माननीय एडवोकेट संदीप जी कदम साहेब तसेच खजिनदार एडवोकेट मोहनराव देशमुख साहेब उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राध्यापिका सोनाली बाविस्करअरबाज सय्यद प्रीती जोशी कुमुद गुजरयांनी परिश्रम घेतले डॉक्टर चंदा हा से प्रकाश पांगारे सुवर्णा खोडदे नीलम जगताप विद्या पाठारे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.










दिनांक ११ फेब्रुवारी २०२१ रोजी स्टाफ वेलफेयर समिती आणि सांस्कृतिक विभागाच्या वतीने महाविद्यालयातील शिक्षकांसाठी तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सिने संगीताचा गायनाचा . कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर गायक कलाकारांनी त्यामध्ये आपल्या कलेचे सादरीकरण केले. कार्यक्रमाची संकल्पना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नितीन घोरपडे यांची होती आणि त्यासाठी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सहायक सह सचिव मा. ए . एम . जाधव अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा सद्दाम घाटवाले यांनी केले . या कार्यक्रमात खालील कलाकारांनी आपली कला सादर केली

**डॉ . संगीता घोडके**
**२. पेहला पिहला प्यार है ------------------------ श्री शंकर अलकुंटे**
**३.आने वाला पल --------------------------------अरबाज सय्यद**
**४.ओ हंसिनी ---------------------------------------डॉ भारत कानगुडे**
**५. आप कि आँखों में कुछ ------------------------डॉ एकार + डॉ माया माईणकर**
**६. बंडी मुश्किल है खोल्या मेरा दिल है --------श्री अशोक मगर**
**७. मनाच्या धुंदीत लहरीत येना --------------------डॉ वंदना पिंपळे**
**८. आपकी नजरोने समजा ---------------------डॉ नंदा राशीनकर**
**९.रुपेरी वाळूत माडांच्या बनात -------------------सौ पूजा राशिंकर**
**१० अरे यारमेरी तुम भी हो गजब ---------------डॉ माया माईणकर + श्री शंकर एकार**
**१०. मन उधाण वाऱ्याचे ------------------------------अरबाज सय्यद**
**११. हवा के साथ साथ -------------------------------डॉ. माया माईणकर + शंकर अलकुंटे**
**१२. दिल तो है दिल ---------------------------------सौ वंदना शिंदे**
**१३.ये दिल ना होता बेचारा -------------------------- श्री शंकर अलकुंटे**
**१४.सावन का महिना --------------------------------डॉ सतीश एकार + डॉ माया माईणकर**
**१५ चंदनसा बदन --------------- ------------------डॉ . संगीता घोडके**
**१६. धूप में निकाल ना करो -------------------------श्री अशोक मगर + डॉ माया माईणकर**

**१७. आजकाल तेरे मेरे प्यार के चर्चे ----------------डॉ मनीषा त्र्यंबके**

जागतिक रंगभूमी दिन  दिनांक २७ मार्च २०२१ प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली हा संपूर्ण कार्यक्रम पार पडला

उदघाटक डॉ नितीन घोरपडे सर

प्रमुख अतिथी श्री सुहास जोशी

सूत्रसंचालन डॉ सतीश एकार

सदारकर्ते  डॉ सतीश एकार

सुहास जोशी डॉ माया माईणकर

काजल कांबळे

जागतिक रंगभूमी दिन  दिनांक २७ मार्च २०२१

१९६२ साली हा सुरु झाला प्राचार्यानी शुभेच्छा दिल्या

नाट्य उतारा किंव्हा स्वागत वाचन

उदघाटक डॉ नितीन घोरपडे सर

प्रमुख अतिथी श्री सुहास जोशी ..प्रतक्याशा नाट्य अभिवाचन विद्यार्थ्यांकडून करून घेतला त्याचे कौतुक केले शिक्षक हा जात्याच कलाकार असतो

सूर्याची पिल्ले नाटकातला

सूत्रसंचालन डॉ सतीश एकार

सादरीकरण

आकांक्षा थोरात ...स्वलिखित स्वागत

सौ पुष्प क्षीरसागर..स्वरचित कविता

डॉ माया माईणकर... मंजुळा ..ती फुलराणी स्वगत

सुनील एकार : नटसम्राट

डॉ सतीश एकार ...तळीराम..एक्चप्याला

डॉ माया माईणकर

समन्वयक

सांस्कृतिक विभाग